# घरफोडीतील अट्टल चोरटा मुद्देमालासह 'एलसीबी'च्या जाळ्यात



नांदेड (प्रतिनिधी)- शहरात घरफोड्या करून पोलिसांना चकमा देणाऱ्या अट्टल चोरट्यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शहराच्या लालवाडी भागात पाठलाग करून ब्रिजखाली अटक केली. त्याच्याकडून चोरीचा मोबाईल आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी माली गुन्ह्यातील आरोपी व मुद्देमालाचा शोध घेवून त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना आदेश दिले होते.

पोलीस उप निरीक्षक नागनाथ तुकडे, साईनाथ पुयड, मारोती चव्हाण व त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदार विलास कदम, गणेश धुमाळ, संदीप घोगरे, बालाजी कदम, अमोल घेवारे, मेजबिन शेख, सायबरचे राजेंद्र सिटीकर आणि दीपक ओढणे असे जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन अभिलेखावरील माली गुन्ह्यातील आरोपी व मुद्देमालाचा शोध घेत असतांना राहुल बालाजी सोनकांबळे हा एक चोरीचा मोबाईल विक्री करण्यासाठी ३ जून रोजी लालवाडी ब्रीजच्या खाली थांबल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस उप निरीक्षक नागनाथ तुकडे, साईनाथ पुयड व त्यांच्या टीमने सदर ठिकाणी जाऊन संशयीतरित्या उभा असलेला युवकाला ताब्यात घेतले. पोलीस दिसताच आरोपी राहुल सोनकांबळे पळाला. पोलिसांनी पाठलाग करून लालवाडी ब्रिजखाली त्याला पकडले. राहुल ऊर्फ बंटी बालाजी सोनकांबळे (वय २९ वर्षे रा. सिंधी ता.उमरी जि. नांदेड ह. मु. तेहरानगर लालवाड़ी नांदेड) असे घरफोडी करणाऱ्या चोरट्याचे नाव आहे. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ एक मोबाईल व नगदी रुपये मिळुन आले. नगदी रुपये व मोबाईल जप्त केला. अंदाजे एक ते दिड महीन्यापूर्वी पाथ्रड ता. मुदखेड येथील एका घरातुन रात्रीच्या वेळी चोरलेला आहे, असे आरोपीने कबूल केले.

त्यावरुन सदर मोबाईलचा IMEI नंबरची पोलीस अभिलेखावर पाहणी केली असता सदर मोबाईल हा पो. स्टे. बारड गुरनं. ४०/३ कलम ३३१(४),३०५ भारतीय न्याय संहिता मधील असल्याचे निष्पन्न झाले. नगदी रुपये व मोबाईल जप्त करुन त्यास बारड पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

दै. देशोन्नती

# जबरी चोरीतील तीन आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात

देशोन्नती वृत्तसंकलन



**नांदेड :** पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सूरू केलेल्या ऑपरेशन फ्लॅश आऊट अंतर्गत स्थानिक गून्हे शाखेच्या पथकाने ४ जून रोजी जबरी चोरी प्रकरणातील तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून ७५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश कोरे व त्यांच्या पथकास भोकर हद्दीतील जबरी चोरी करणारे तिन आरोपी अरविंद बाबुराव आडेपवार (२१), विजय भिमराव आंबटवाड (२०), ऑटोचालक व गणेश ऊर्फ बाळया बालाजी आमदरे (२०) तिघे रा. सोनारी ता. भोकर हे सेवालाल चौक भोकर येथे असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून पथकाने सदर आरोपीचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेवुन कसून चौकशी केली असता त्या तिघांनी मिळुन भोकर हद्दीत गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीकडून पोलिसांनी ७५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.